# ।। गुरु सिष को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ गुरू सिष को संवाद लिखंते ।।

शिष्य वायक ।। चोपाई ।।

प्रथम सिष सतगुरू कुं बुजे ।। मो पर किरपा किजे ।।
भ्रम क्रम दुबद्या भे भांजो ।। सिष को सरणे लीजे ।।१।।

सतगुरु सुखरामजी महाराजांना शिष्याने सर्व प्रथम स्वत:च्या भ्रम,कर्म,भय व दुबध्या भंग करुन,शरणात ठेवण्याची प्रार्थना केली. ।।१।।

उपजे खपे जीव जुग बन्धीया ।। छुटन सके कोई ।।
माया ब्रम्ह हुवे किम न्यारा ।। भेव बतावो मोई ।।२।।

जीव संसारात उपजत आहे.खपत आहे व ब्रम्हा,विष्णू,महादेव या त्रिगुणी मायेच्या बंधनात अटकून गेला.सुटणे चाहतो तर सुटू शकत नाही.म्हणून हा जीव मायेतून सुटून ब्रम्ह कसा होईल.हा भेद मला सांगा म्हणून गुरु महाराजांना प्रार्थना करतो. ।।२।।

भगत जोग जुग सबे बखाणे ।। दसवी ग्यान सरावे ।।
ब्रम्ह जोग केसे नर साजे ।। पराभक्त किम पावे ।।३।।

सर्व जग भक्ती योग म्हणजे दहावेद्वारात पोहचण्याचे ज्ञान वर्णन करतात.असा ब्रम्ह योग म्हणजे पराभक्ति कशी साधतात व प्राप्त करतात हा भेद मला शिकवा. ।।३।।

भिन भिन भेव सकळ बिध कहिये ।। किरपा कर समझावो ।।
न्यारा अरथ करण बिध सारी ।। परगट मोय लखावो ।।४।।

पराभक्तिचा वेग–वेगळ्या विधीने पूर्ण ज्ञान समजवा.पराभक्तिचा वेग–वेगळा अर्थ व सर्व बारीक हून बारीक विध्या मला समजवा. ।।४।।

गुपता अरथ कुंप जळ कहीये ।। पंछी पीव सके नही कोई ।।
तम सतगुरू केण बिध लायक ।। परगट कहीये मोई ।।५।।

हा पराभक्तिचा अर्थ खोल आहे.खोल विहीरीतील पाण्यासारखा आहे.खोल विहीरीतील पाणी पक्षी पिवू शकत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज आपण हे सर्व अर्थ, विध्या जीवांना समजावण्या लायक आहात.म्हणून हे सर्व अर्थ व विध्या,मला प्रगट करुन सांगा. ।।५।।

सब ही अर्थ करो जळ सरवर ।। भर भर पीवे बिचारा ।।
ऊगे सुर गेल सब दरसे ।। उजड पंथ नियारा ।।६।।

सर्व अर्थ पाण्यासारखे ऐकवा.जसे सरोवरातील पाण्याला सर्व पशु पक्षी पोट भरुन–भरुन पितात.तसे सर्व जीव पराभक्ती सहजमध्ये समजून घेतील.असे करुन सांगा.सुर्य उगवल्यावर उजेड तसेच पक्का रस्ता जीवांना जसा वेग–वेगळ्या तऱ्हेने सुचतो,तसेच पराभक्तीचे ज्ञान भिन्न–भिन्न तऱ्हेने समजेल अशी ज्ञान रचना करण्याची कृपा करा.

।।६।।

सब बिध रित राह गुरू कहीये ।। झाटक मोय बतावो ।।
तोल मोल किमत गुण किरीया ।। शब्द बंध उर ल्यावो ।।७।।

पराभक्तीच्या सर्व विध्या,रीत,रस्ते सर्व झाडून झटकून काही बाकी न ठेवता मला सांगा.तोल,मोल,किंमत,गुण,क्रिया,शब्द,बन्ध जीवाच्या ह्दयात बसतील असे समजवा. ।।७।।

तिनु ध्रम हद कुं बरणो ।। कसर न राखो कोई ।।
कुंण कुंण धरम कुंण फल लागे ।। सो मुझ दो बताई ।।८।।

हदच्या ब्रम्हा,विष्णू,महादेवाच्या धर्माचे काही कसर न ठेवता वर्णन करा.कोणत्या-कोणत्या भक्तीचा काय-काय फळ लागते.हे सर्व मला सांगा.।।८।।

कुंण कुंण धरम किसी बिध साजे ।। हाल चाल सब कहिये ।।
देह बिध रूप धरे जुग माई ।। कहो किसी बिध रहिये ।।९।।

कोणता-कोणता धर्म,कोणत्या कोणत्या विधीने साधला जातो.अशा तिन्ही धर्माची हालचाल सर्व मला सांगा.संसारात वेग-वेगळे देह रुप धारण करतात.ते वेग-वेगळे देह रुप धारण करतात.ते वेग-वेगळे देह कोण-कोणत्या विधीने धारण करतात ते सांगा. ।।९।।

किरपा करो गुरू सिष उपर ।। परसण होय बिस्तारो ।।
सब जुग भेद भेव सो दिजे ।। सिष कुं सरण ऊबारो ।।१०।।

आपण गुरु शिष्यावर प्रसन्न होवून विस्ताराने सांगा.संपूर्ण जगाचा भेद आपण मला द्या व मला शरणात घेवून,मायेपासून वाचवा. ।।१०।।

प्रथम रीत कहो नवध्या की ।। नख चख सहेत बतावो ।।
आद अन्त नेपत केण किरीया ।। शब्द भेद दरसावो ।।११।।

प्रथम नवधा भक्तीची नखा पासून चक्षुपर्यंत(डोळ्यापर्यंत)सर्व रीत समजवा.जसे शेतात पेरणी पासून धान्य येई पर्यंत क्रिया होते तसे शब्दाचा आदिपासून अंत पर्यंतचा भेद सांगा.।।११।।

गुरू वायक ।।

सिष पर माया मेर गुरू किनी ।। भक्त भेद मुख भाखे ।।
सावधान सबही होय सुणज्यो ।। कसर कोर नही राखे ।।१२।।

सतगुरुंनी शिष्याशी प्रीती करुन सर्व भक्त्यांचे झाडून झटकून भेद सांगीतले.हे भेद सर्व सावधान होवून ऐका.ऐकण्यात कसर कोर ठेवू नका. ।।१२।।

सुण सिष भक्त भेद सब न्यारी ।। नवधा नव प्रकारी ।।

**गावे सुणे टेल लघुताई ।। मुरत पुज बिचारी ।।१३।।**

ऐक शिष्य,सर्व भक्तीचा भेद सर्व वेग-वेगळा आहे.नवद्या भक्ती नऊ प्रकारची आहे. १.श्रवण २.किर्तन ३.स्मरण ४.पादसेवा ५.पूजा ६.वंदना ७.दास्य ८.सख्य ९.आत्मनिवेदन याप्रकारे नवद्या भक्ती नऊ प्रकारची आहे.

१. श्रवण-कोणी ज्ञान किंवा पद गाईल,कानाने ऐकणे.
२. किर्तन-ज्ञानाचे व पदाचे किर्तन करणे.
३. स्मरण-नित्य मुखाने नामाचे स्मरण करणे.
४. पादसेवा-सेवा करणे,चन्दनादिक अर्चन करणे.
५. पूजा-मुर्तिची पुजा करणे.
६. वन्दना-नित्य मंदिरात जाणे.
७. दास्य-दास भाव ठेवणे.
८. सख्य-विना कपट ने मैत्री ठेवणे.
९. आत्मनिवेदन-आत्मनिवेदन करणे.

किर्तन करणे,कानाने ऐकणे,सेवा करणे(साधुची किंवा दगडाच्या मुर्तिची)सेवा करणे, लघुताई ठेवणे,मुर्ति पुजा करणे. ।।१३।।

**सरवण सुण ज्ञान नर सीख्या ।। भिन भाव बहो राखे ।।**
**छापा तिलक गले बोहो माला ।। नाम सुर गुण नित भाखे ।।१४।।**

कानाने ज्ञान ऐकून शिकणे,खुप वेग-वेगळ्या तऱ्हेचा भाव ठेवणे,छापा,टिळक लावून गळ्यात खुप साऱ्या(तुळशीची,रुद्राक्षाची,चंदनाची)माळा टाकणे आणि मुखाने सगुण नामाचा नित्य जप करणे. ।।१४।।

**बरत बास इग्यारस करणी ।। धाम तिर्थ फिर जावे ।।**
**सेवा करे सपांड्रा जल ले ।। चोका नित्त दिरावे ।।१५।।**

व्रत करणे,उपवास करणे,एकादशी करणे आणि सर्व धामात आणि तिर्थात फिरायला जाणे, सेवा करणे,पाणी घेवून पाण्याने स्नान करणे तसेच चौका लावणे. ।।१५।।

**पाणी पीवे डोर सुं खांचर ।। उन मांही बोहो किरीया ।।**
**बेर बेर पाणी पग धोवे ।। भांय बायर घर फिरीया ।।१६।।**

आपल्या हाताने दोराने पाणी खेचून पीतो.(मारवाड देशात काही जागा सोडून इतर सर्व जागी(ठिकाणा)मोटेचे पाणी पितात.परंतु हा सोहळा(पवित्रता)ठेवणारे आपल्या हाताने दोराने पाणी खेचून पितात.मोटेचे पाणी पित नाही)खुपशी उत्तमता ठेवून,खुपश्या क्रिया करतात आणि नेहमी-नेहमी(वारंवार)जमिनीवर पाय ठेवल्याने किंवा बाहेरुन फिरुन घरात आल्यावर वारंवार पाय धुतात. ।।१६।।

सील साच संतोष सम सुं ।। कर फेरे नित्त माला ।।
दया दान देवळ नित्त जाणो ।। ज्या त्या फिरे वो पाळा ।।१७।।

शील(ब्रम्हचर्य)ठेवणे,साच(विश्वास),सन्तोष आणि समता(सर्वांना आपल्या आत्म्या सारखे जाणतो)तसेच नेहमी हाताने माळा फेरत असतो.(मुखाने नाम जप करो या न करो परंतु हातात माळा फेरत असतो मुखाने दुसऱ्या गोष्टी करतो तरी हातात माळा फेरने सुरु ठेवतो)आणि मनात दया ठेवणे,दान देणे तसेच नित्य मंदिरात जाणे,जेथे जेथे जातो,तेथे तेथे पायानेच जातो.(गाडीवर किंवा घोड्यावर बसत नाही.)आणि देव दर्शन करण्यास जाते वेळी पायात जोडे(चप्पल)घालत नाही. ।।१७।।

ब्रम्हा बिस्न महेसर तीनुं ।। दुबध्या दोय न जाणे ।।
निंद्या तजे नांव नित्त लेवे ।। सब कूं सरस बखाणे ।।१८।।

ब्रम्हा,विष्णू,महेश या तिघांना एकच जाणतो.म्हणजे तिन्ही देवतांमध्ये फरक करीत नाही.सर्वांना विष्णूचे रुप जाणतो.जगातील सर्व छोटे मोठे देवता एवम् प्राणीमात्रांना स्वत:पेक्षा मोठे समजतो.कोणाचीही जराही निंदा करीत नाही व नित्य(मायावी)नामाचा जप करतो. ।।१८।।

सेवा करे चंनण बोहो चरचे ।। गावे सुणे सियाणा ।।
नवद्या भक्त इसी बिध कहिये ।। ए अंग सोच मै आणा ।।१९।।

सर्व देवतांची पुरा करुन, सर्व देवतांच्या मुर्तिवर खुपसे चन्दन लावतो.स्वत: पद गातो. आणि दुसऱ्यांना ऐकवतो.समजदारपणाने राहतो.या प्रकारच्या भक्तीचा नवद्या भक्ती म्हणतात.भक्तीत दोष राहू नये असा विचार करुन भयभीत राहतो. ।।१९।।

साचे मते होय जन साजे ।। कसर न राखे काई ।।
तब फल जाय लगे नवद्या को ।। बिसन लोक के मांई ।।२०।।

याप्रकारे खऱ्या मताने विश्वास ठेवून,भक्त बनून साधेल व साधणा करण्यात कोणती ही कसर ठेवणार नाही.तेंव्हा कोठे या नवद्या भक्तीचे फळ लागेल.या नवद्या भक्तीचे फळ विष्णूच्या लोकात(वैकुंठात)मिळेल. ।।२०।।

तन मन धन सिस कुं सूंपे ।। काची कदेन ल्यावे ।।
ए अंग मिल्या निसो दिन झूंजे ।। बिसन लोक नर जावे ।।२१।।

आपले तन,मन,धन येथ पर्यंत की आपले शिश ही सोपून देईल आणि मनात कधी ही कच्चापणा आणत नाही.या तऱ्हेच्या स्वभावाने रात्रं-दिवस झुंजेल तोच मनुष्य विष्णूच्या लोकात वैकुंठात जाईल. ।।२१।।

जिग जाप सो जोग जपीजे ।। चित्त चेतन सुध होई ।।
गत मुगत बिसन फल पावे ।। कपट न राखे कोई ।।२२।।

यज्ञ करतात,जाप करतात,योग साधतात,जाप जपतात आणि चित्त चेतन शुध्दी ठेवतात चित्तामध्ये कोणत्या प्रकारची अशुध्दता येवू देत नाही आणि कोणते ही कपट ठेवत नाही.ज्यामुळे मुक्तीत जावून,विष्णूच्या वैकुंठ लोकाचे फळ मिळते. ।।२२।।

सुण सिष बिसन भक्त बिध न्यारा ।। ऐ अंग साजे साधू ।।
जेसी सजे मुक्त गत तैसी ।। इधक न ओछी बाधू ।।२३।।

शिष्य ऐक,विष्णूच्या भक्तीची ही विधी आहे.हे असे स्वभाव कोणी साधु साधेल,त्याला विष्णूचा लोक मिळेल.जशी भक्ती करेल तशीच त्याला मुक्ती आणि गती मिळेल.त्याचे फळ जास्त ही नाही आणि खोटे ही नाही किंवा कमी वा जास्त काही मिळणार नाही. (जसे भक्ती त्याच्याने साधली जाईल,तितकेच फळ त्याला मिळेल.) ।।२३।।

च्यारूं मुक्त बैकुंठ बिराजे ।। न्यारी तुज दरसाऊँ ।।
नांव रीत न्यारी नर पावे ।। बिष्ण भेद ऊर लाऊँ ।।२४।।

वैकुंठात चार मुक्ती आहे त्या चार तऱ्हेच्या चारी मुक्ती,तुला वेग–वेगळ्या सांगतो.त्या मुक्त्यांचे नाव वेग–वेगळे आणि रीती ही वेगवेगळ्या आहे.विष्णूचा भेद हृदयात आणतात त्यांना ही मुक्ती मिळते. ।।२४।।

सालोक जो समीप ।। सायुज बोहोत बखाणी ।।
सारूप भक्त मुक्त वे पावे ।। कहुं भेद तत्त छाणी ।।२५।।

पहीली मुक्ती सालोक्य(विष्णूच्या देशात वैकुंठात जाणे)दुसरी सामीप्य(सभेत जावून बसणे)आणि तिसरी मुक्त सायुज्य(विष्णू जवळ छोट्या भावाप्रमाणे बसणे)आणि चौथी मुक्ती सारुप्य(विष्णू सारखा विष्णू होवून जाणे)या तऱ्हेने याच्या भेदाचे तत्त निवडून सांगतो. ।।२५।।

पेलो मुक्त लोक मे आया ।। दुजी सभा बिराजे ।।
तिजी मुक्त पास ले बेठा ।। चोथी बिष्ण कहीजे ।।२६।।

पहीली मुक्ती विष्णूच्या लोकात वैकुंठात येणे.दुसरी मुक्ती विष्णूच्या सभेत जाऊन बसणे,तिसरी मुक्ती विष्णू आपल्याजवळ घेऊन बसतो आणि चौथी मुक्ती विष्णू रुपाने विष्णू होवून जाणे. ।।२६।।

तन मन अर्प भक्त कुं साजे ।। जुग सुख बंछे न कोई ।।
मन की मूंठ विष्ण पद मांहि ।। सुख दु:ख लगे न दोई ।।२७।।

जो कोणी भक्त आपले तन,मन अर्पण करुन भक्ती साधेल आणि या जगाच्या सुखाची कोणी चाहना करणार नाही.सुख आणि दु:ख माहित न करता मनाची पकड विष्णूच्या पदात राखेल. ।।२७।।

सेवा मांय बिराजे सुन मुख ।। बात बिगत नही करणी ।।

काम काज सब ही बिध तज के ।। सुरत बिसन मे धरणी ।।२८।।

आणि सेवेमध्ये सेवा करायला समोर बसून राहील्याने कोणाशी गोष्ट करणार नाही. काही ही बोलणार नाही.सर्व विधीचे कामकाज सोडून आपली सुरत विष्णूमध्ये लावून देईल. ।।२८।।

मुरत मांय मन ले घाले ।। दुजी सुध बिसरावे ।।
लाय लगे बेरी सीर आवे ।। ऊठ भाग नही जावे ।।२९।।

आपल्या मनाला विष्णूच्या चरणात लावून देईल आणि दुसऱ्या सर्व आठवणी विसरुन जाईल.पुजा करण्याकरीता मुर्तिच्या समोर बसून राहील्यावर आग लागून गेली किंवा कोणी दुश्मन मारण्याकरीता वर चालून आला तरी ही पुजेमधून उठून पळून जाणार नाही.।।२९।।

चरणामृत लहे प्रसादी ।। रामकिसन की सेवा ।।
सालग राम खोळ नित पीवे ।। बिष्ण भक्त अे भेवा ।।३०।।

मुर्तिचे घुतलेले चरणामृत घेतो आणि प्रसादी घेतो.राम आणि कृष्णाच्या मुर्तिची पुजा करतो आणि शालीग्राम धुवून-धुवून धुतलेले पाणी पितो.हा सर्व विष्णूच्या भक्तीचा भेद आहे.।।३०।।

अेसी रीत बिध सब साजे ।। बिष्ण लोक मे जावे ।।
सुखरत बंधे पले नर जेतो ।। ताहाँ लग मांय रहावे ।।३१।।

अशा रीतीने सर्व विधी साधेल तोच विष्णूच्या लोकात जाईल.तेथे विष्णूच्या लोकात पदरात सुकृत(पुण्य)आहे.तोपर्यंत राहील तोपर्यंत मनुष्याला वैकुंठात राहु देतात.।।३१।।

जुग मे रहे ब्रत कूं साजे ।। सेंस जुग करे सेवा ।।
नेचे आण पडे धरणी पर ।। तीन लोक सु देवा ।।३२।।

संसारात राहून या तऱ्हेने प्रणव्रत साधून,हजार युगा पर्यंत सेवा करेल.तेंव्हा विष्णूच्या लोकाचा देवता बनेल.याप्रकारे तिन्ही लोकात बनलेले देव धरती वर येवून ८४ लक्ष योनीत पडतील.।।३२ ।।

आवागवण मिटे नही कोई ।। जम जंजाळ नही चुके ।।
सुख दुख दोय तांके रहे संगी ।। असवार चोर ज्युं ढुके ।।३३।।

विष्णूच्या लोकात येणे जाणे,जन्मणे,मरणे काही मिटत नाही.आणि वैकुंठात जाण्याने यमाचा जंजाळ(त्रास)चुकत नाही.वैकुंठाचे सुख आणि चौऱ्यांशीचा फेऱ्याचे दु:ख विष्णूच्या लोकात गेले तरी ही त्याच्या सोबतच राहते आणि घोडेस्वार जसे चोर चोरी करुन जातात तर त्याला पकडायला त्याच्या मागे जातात.ते घोडेस्वार जावून चोराला पकडून घेतात. त्याचप्रकारे काळ विष्णूच्या लोकात जावून विष्णूच्या भक्तांना पकडून आणतो.

।।३३।।

नेःचे मुक्त नही हे कोई ।। च्यार दिना सुख कहिजे ।।
जब चल काल बिश्न कुं पकडे ।। कुण सरण तब रहिये ।।३४।।

वैकुंठात गेल्यावर निश्चित म्हणजे सदाची(कायमची)मुक्ती नाही.तेथे वैकुंठात चार दिवसाचे सुख आहे.त्याला भोगून घ्या.जेंव्हा हा काळ चालत जावून विष्णू लाच पकडेल तेंव्हा विष्णूचे भक्त कोणाच्या शरणात राहतील. ।।३४।।

विष्ण धर्म शंकर सुख दाई ।। तीन लोक बिस्तारा ।।
जेसी करे तेसी गत पावे ।। सुण सिष अेह बिचारा ।।३५।।

विष्णू धर्म आणि शंकर धर्म सुख देणारे आहेत.या विष्णू आणि महादेव तीन लोक स्वर्ग लोक,मृत्यु लोक आणि पाताळ लोकाचा विस्तार आहे.मनुष्य जसी करणी करेल तशीच गती त्याला मिळेल.हे शिष्य तुम्ही ऐका व याचा विचार करा.।।३५।।

आवागवण बोहोर नही आवे ।। सुख दुःख धरे न काया ।।
सो पद ब्रम्ह क्रम सुं न्यारो ।। सतगुरू मोय लखाया ।।३६।।

आवागमनात पुनः येणार नाही.मायेचे सुख आणि काळाचे दुःख हे तर तेंव्हा सुटतील की जेंव्हा शरीर धारण करणार नाही.ते पद सतस्वरुप ब्रम्हचे आहे.ते पद माया म्हणजे कर्म काळापासून वेगळे आहे.असे पद सतगुरुने मला समजावले. ।।३६।।

प्रमपद बिध भेद बिचारा ।। आगे सिष बताऊँ ।।
अब सुण देव लोक की बातां ।। भांत भांत सुं लाऊँ ।।३७।।

परमपदाच्या विधीचा भेद विचारतात तर हे शिष्य तो मी तुम्हाला पुढे सांगेल.आता तर तुम्हाला देवलोकांच्या गोष्टी वेगवेगळ्या तऱ्हेने आणून मी सांगतो, ते ऐका. ।।३७।।

तपस्यां करे जत कुं साजे ।। करवत झांप भरे हे ।।
ज्यां मन जक्त जीवतां राखे ।। ताहि जन्म धरे हे ।।३८।।

कोणी तपस्या करेल कोणी जत(ब्रम्हचर्य)साधेल.कोणी काशी मध्ये करवत(आरा) चालवेल आणि कोणी झाप घेवून मरेल.संसारात जिंवतपणी जेथे मन ठेवेल.तेथेच मेल्या नंतर जन्म घेईल. ।।३८।।

राजा राव पातस्या जुग मे ।। तपस्या कर फल पावे ।।
इनमे फेर करारी खांचे ।। देव लोक मे जावे ।।३९।।

आणि राजा,राव आणि बादशहा हे संसारात तपस्या करुन फळ प्राप्त करतात.तपस्या करणारा राजा होतो.थोडी तपस्या करणारा राव होतो.अति कठीण तपस्या करणारा बादशहा होतो आणि योग भ्रष्ट झालेले लोक जहांगिरदार,जमिनदार आणि सेठ सावकार किंवा हुद्देदार, अमलदार होतात. तपस्या करुन तपस्येचे फळ प्राप्त करतात

आणि यांच्या पेक्षा अति कठीण तपस्या करतात ते देवलोकात जातात. ।।३९।।

**जिग सो करे एक सो जुग मे ।। बिच बिंधुसन पावे ।।**
**तां के ध्रम जाय व्हे इंद्र ।। सुर तेतीस सरावे ।।४०।।**

शंभर यज्ञ करुन शंभर यंज्ञाच्या नंतर एक अश्वमेघ यज्ञ करतात.हे शंभर यज्ञ करण्यात यज्ञ विध्वंस होणार नाही.तर या यज्ञाचा धर्माने जावून तेहतीस कोटी देवांचा राजा इंद्र बनतो.मग तेहतीस कोटी देव ही त्याला आपला राजा मानून त्याची शोभा करतात.।।४०।।

**अभे भे दान किन्या दे गायां ।। सील झूट नही भाखे ।।**
**बोहो बिध ध्रम करे नर जुग मे ।। देव लोक मे राखे ।।४१।।**

आणि अभयदान म्हणजे भयभीत झालेल्याला भयरहीत करणे आणि आपल्या पत्नीला चांगले कपडे तसेच चांगले दागिने घालून पत्नीचे दान घेणाऱ्या कडून खरेदी करुन घेतात.त्याला अभयदान म्हणतात आणि कोणी कन्या दान करेल आणि गौ(गाय)दान करेल,शील(ब्रम्हचर्य)पूर्वक राहील,खोटे कधी ही बोलणार नाही.खुप विधीने हे धर्म कोणी मनुष्य संसारात करेल त्या मनुष्यास देवलोकात राहू देतात. ।।४१।।

**सुक्रत पले बन्ध्यो जांहां लग ।। धिन्न धिन्न नर होई ।।**
**खुटे दाम पलक नही राखे ।। कोलु तजे वे छोई ।।४२।।**

त्याच्या पदात बांधलेले सुकृत,जो पर्यंत त्याच्या जवळ आहे.तो पर्यंत त्याला देव लोकात धन्य-धन्य म्हणतात.त्याच्या जवळचे सुकृतरुपी दान समाप्त झाल्यावर त्याला पळभर ही देव लोकात राहू देत नाही.जसे उसाचा रस काढणारा घाणा उसाचा रस निघून गेल्याने सालपट बाहेर फेकून देतो.त्याचप्रकारे पुण्य समाप्त झाल्यावर,उसाचा रस काढल्या नंतर उरलेल्या सालपटा सारखे(चोथ्यासारखे)फेकून देतात.तसे देवतांचे लोक देव बाहेर होवून जातात.आपल्या लोकातून बाहेर करुन देतात. ।।४२।।

**सुर तेतीस देवता कहिये ।। सुकरत कर कर हुवा ।।**
**मुक्ति मोख प्रमपद कहिये ।। तां सु रे गया जुवा ।।४३।।**

हे देवलोक ३३ कोटी देवता म्हणवितात.ते मृत्युलोकात मनुष्य शरीराने सुकृत करुन देव लोकात देवता बनलेले आहेत.ज्याला मुक्ती,मोक्ष,परमपद म्हणतात.त्यापासून हे देवता लोक वेगळे राहून गेले. ।।४३।।

**सुक्रत कियो जुग के मांही ।। देव लोक मे जावे ।।**
**उलटा जाय हुवा वां दुखीया ।। नर देह अब कब पावे ।।४४।।**

येथे मृत्युलोकात जे मनुष्य सुकृत(चांगले कर्म)करतात.ते देव लोकात जातात आणि ते तेथे दु:खी होवून जातात आणि त्यांना दु:ख होते की आता आम्हाला मनुष्य देह

केंव्हा मिळेल? ।।४४।।

**जब तो काळ बुध थी थोडी ।। देव लोक ही बुझ्या ।।**
**प्रमपद की खबर न पाई ।। अबे परे तत्त सुझ्या ।।४५।।**

जेंव्हा आम्हाला मनुष्य शरीर मिळाले होते,त्यावेळी आम्हाला बुध्दी नव्हती.म्हणून देवलोकालाच मोठे समजून,देवलोकातच जाण्याची विचारपूस केली.देवलोकात मोठे सुख आहे.देवलोकापेक्षा जास्त(अधिक)कोणी ही नाही,असे समजत होते.परंतु येथे देवलोकात आल्यावर,देवलोक एकदम तुच्छ दिसू लागला.येथून पुण्य समाप्त झाल्यावर चौऱ्यांशी लाख योनीत यावे लागेल.आणि चौऱ्यांशी लाख योनीतून कोणत्या योनीत जावू,याचे आपल्या समोर चित्र दिसू लागते आणि येथे देवलोकात किती वर्ष राहू तितक्या फुलांचा हार आपल्या गळ्यात घालून दिला जातो.येथे एक वर्ष पूर्ण झाल्यावर गळ्यातील फुलांच्या हारातील प्रत्येक वर्षी एक फुल गळून पडून जाते.त्याच्याने उरलेल्या फुलांनी येथे किती वर्षे राहावे लागेल.ते समोर दिसू लागते.उरलेल्या फुलांना मोजल्या नंतर अजुन आयु किती बाकी आहे हे माहित होते.ते समोर दिसू लागते, याची खुप भिती वाटते.मृत्युलोकात आयु किती राहीली हे माहित पडत नाही.म्हणून मृत्युची भिती माहित होत नाही.परंतु येथे तर प्रत्येक वर्ष पूर्ण झाल्यावर गळ्यातील हारातील एक एक फूल गळून पडते.ज्यामुळे मृत्यु समोर दिसू लागतो.आम्ही जेंव्हा मनुष्य शरीरात होतो त्यावेळी आम्हाला परमपदाची खबर मिळाली नाही.परंतु आता या देवलोकाच्या पलिकडील तत्त सुचू लागले. ।।४५।।

**पसरी बुध सुध सब सारे ।। सब मे रही समाई ।।**
**मुक्त प्राण नार नर हूवा ।। अब सो सरे न काई ।।४६।।**

आता आपली बुध्दी फैलली आता आपच्या सर्वात सुध,बुध सामावून राहीली आहे. आता आम्हाला आमच्या वरचा लोक आणि पद दिसू लागतो.येथिल देवलोकाचे सुख तुच्छ वाटते.मनुष्य शरीरातून स्त्री-पुरुष प्राण मुकत म्हणजे मृतक झाल्यावर आता परमपद प्राप्त करण्याचे कोणते ही काम करु शकत नाही. ।।४६।।

**निर्बळ प्राण इंद्रिया थाकी ।। सूज बूज बळ न होई ।।**
**काम धाम नर अकल बतावें ।। फळ सो लग्या न कोई ।।४७।।**

मनुष्य शरीरात अंतिम वेळी प्राण निर्बल होवून जातो.सर्व इंद्रिय थकून जातात.विचार करण्याच्या शक्तीचे बळ राहत नाही आणि मनुष्य आयुष्यात केलेले शुभ काम-धाम तसेच अक्कलेने परमपदाचे फळ प्राप्त झाले नाही. ।।४७।।

**देव लोक सारी बिध साजे ।। हद बेहद के मांही ।।**
**केवळ ब्रम्ह विष्ण लग पेला ।। वा गत समजत नांही ।।४८।।**

देवलोकाच्या सर्व विध्यांनी साधना केली.हद आणि बेहदच्या ही सर्व विध्यांची साधना केली.परंतु विष्णूच्या ही पुढे, कैवल्य ब्रम्ह आहे त्याची गती समजलो नाही. ।।४८।।

**ताके लिये बंछे नर देही ।। परा भक्त अब किजे ।।**
**आवागवण जन्म अर मरणा ।। क्रम काट सब दिजे ।।४९।।**

म्हणून देवलोकातील देव मनुष्य देहाची चाहना करतात.तोच मनुष्य देह ज्याची चाहना देव करतात.त्या मुनष्य शरीरात आता आम्ही आहोत,आम्हाला मनुष्य देह मिळाला आहे.तर त्याच्यात पराभक्ती करुन घ्या.आवागमन जन्म घेणे आणि मरणे तसेच सर्व कर्म कापून घ्या. ।।४९।।

**सुण सिष देव लोक की बातां ।। इण बिध सकळ बुहारा ।।**
**कहुँ कांहा लग समजे थोड़ी ।। एक अर्थ मे सारा ।।५०।।**

देवलोकातील गोष्टी शिष्य ऐका.या विधीचा सर्व व्यवहार आहे.मी अजून काय सांगू थोड्क्यात समजून घ्या.एका अर्थात सर्व गोष्टी समजून घ्या.।।५०।।

**अब सुण सरब भक्त मत्त दाखु ।। रित बिध गत न्यारी ।।**
**ब्रम्हा को सतधाम कहीजे ।। तिण आ मान्ड पसारी ।।५१।।**

आता ऐका,सर्व भक्ती आणि सर्व रीती तसेच सर्व मत मी दाखवतो.सर्व विधी आणि गती वेग-वेगळे सांगतो.ब्रम्हाचा जो सतलोक म्हणतात.ज्या ब्रम्हाने सृष्टीचा हा सर्व पसारा केला आहे.त्या ब्रम्हाचा लोकाचा सतलोक म्हणतात. ।।५१।।

**ब्रम्हा रटत केवळ पद नेचे ।। अन्तर ध्यान समाया ।।**
**आठ पोर दिन रात रेण मे ।। एक ब्रम्ह लिव लाया ।।५२।।**

तो ब्रम्हा स्वत: त्या कैवल्य पदाचे निश्चिंत होवून रटन करतो आणि आतमध्ये सतस्वरुप ब्रम्हा सारखा सामावतो.तो ब्रम्हा स्वत: आठो प्रहर रात्रं-दिवस एक सतस्वरुप ब्रम्हशी लीव लावून राहतो. ।।५२।।

**संख ग्यान जुग मांय ऊचार्‍यां ।। आप मिलण का भेवा ।।**
**जो नर कसे सजे सो नेचे ।। ब्रम्ह मिले  हर देवा ।।५३।।**

त्या ब्रम्हाने संसारात संसारातील लोकांकरीता सांख्यज्ञान उच्चारण करुन,सांख्यज्ञान साधून,आपल्यात मिळण्याचा भेद सांगीतला.जो मनुष्य कसून सांख्ययोगाची साधना करेल आणि निश्चय करेल तर त्याला ब्रम्ह मिळेल म्हणजे सतस्वरुप हर मिळेल. ।।५३।।

**संख जोग ऐसी बिध साजे ।। सो सिष तोय बताऊँ ।।**
**चेतन होय सुध मन राखे ।। ब्रम्ह भेव सब गाऊँ ।।५४।।**

सांख्ययोगाची साधना करण्याची ही विधी आहे.या तर्‍हेने साधना करायला पाहिजे.त्याला

मी,हे शिष्य तुम्हाला सांगतो.तुम्ही हुशार होवून मन शुध्द ठेवून ऐका.मी वेग–वेगळ्या तऱ्हेने तुम्हाला सतस्वरुप मिळण्याचा भेद सांगतो. ।।५४।।

आतम ब्रम्ह सकळ मे देखे ।। दिष्ट पड़े सो देवा ।।
निंद्या दोस बेर नहीं बंधे ।। सेज सकळ की सेवा ।।५५।।

सर्वांमध्ये आत्म ब्रम्ह पहा,जे जे देह दृष्टित आले त्यांना आत्मदेव ही माना कोणाची निंदा करु नका,कोणाशी द्वेष करुन कोणाशी वैर बांधु नका.सर्वाची सेवा सर्व आत्मदेव समजून सहज करा.।।५५।।

सुकरत करे दोष के बांधे ।। पाप पुन्न जुग मांही ।।
दोनु देख सम मन राखे ।। निंदे बेदे सो नाही ।।५६।।

कोणी सुकृत करतात,कोणी निच कर्म करतात,कोणी संसारात पाप करतात आणि कोणी संसारात पुण्य करतात.तर हे दोन्ही(सुकृत करणारा आणि निच कर्म करणारा, पाप करणारा आणि पुण्य करणारा,दोन्ही ही)पाहून दोघांना आत्मदेव समजून दोघांवर आपले मन समान ठेवा.दोषी(गुन्हा करणारा)आणि पापी(पाप करणारा)ची निंदा आणि सुकृत किंवा पुण्य करणाऱ्याची वंदना करीत नाही.म्हणजे दोघांना मनाने एक समान जाणतो. ।।५६।।

करणी करम करे ना बरजे ।। सेजां सकळ बुहारा ।।
सुख दुःख दोय एक कर जाणे ।। आप सकळ सुं न्यारा ।।५७।।

पुण्य,पाप करनी कर्म स्वत: करीत नाही आणि पुण्य,पाप करनी कर्म करणारे दुसऱ्यांना ही मना ही करीत नाही. सर्वांमध्ये आत्मदेव आहे हे समजून सहज रुपात सर्व व्यवहार करतो व मायेचे सुख व काळाचे दुःख या दोघांना एक करुन जाणतो.मी सर्व सुख दुःखापासून परे वेगळा आत्मदेव आहे. असा नेहमी सहजमध्ये व्यवहार करतो. ।।५७।।

एसो अर्थ करे मन भीतर ।। ब्रम्ह बिना नही कोई ।।
सब ही अरथ आद ले देखे ।। हर बिन अवर न कोई ।।५८।।

आणि मनात असा अर्थ करतो की,सतस्वरुप ब्रम्हाशिवाय काहीही नाही.करणारा आणि करवणारा सतस्वरुप ब्रम्हच आहे.ब्रम्हाच्या शिवाय दुसरा कोणी ही नाही.सर्वांचे आदिचे ज्ञान पाहून बघतो की आदिपासून(रामजी)शिवाय दुसरे कोणी ही नाही. ।।५८।।

सातु धात तिन गुण प्रगत ।। पांच तत्त बिन नांई ।।
जुग सो खेल आप ही हुवा ।। फेर बिराजे मांई ।।५९।।

सातही धातू,तीन गुण आणि पंचविस प्रकृती,पाच तत्व हे हर शिवाय नाही.या संसाराच्या खेळात तो स्वत: हरच आला आणि तोच सर्वांमध्ये बसला आहे. ।।५९।।

ऐसा ग्यान बिचार समाया ।। होणहार सुं होई ।।

सुर्ग नरक भू लोक पताळा ।। ओ हर बिन अवर न कोई ।।६०।।

जसे होणार आहे तसे होणार असे ज्ञान मनात धारण करतो आणि तो असे समजतो की स्वर्ग काय आणि नर्क काय भूलोक काय आणि पाताळ काय हे सर्व हरीच्या शिवाय दुसरे काही ही नाही. ।।६०।।

च्यारू खाण बाण सो सारा ।। नख चख सकळ पसारा ।।
दुतिया भाव दोय नही जाणे ।। माया ब्रम्ह नियारा ।।६१।।

चारी खाणींमध्ये आणि चारी वाणीमध्ये नखा पासून डोळया पर्यंत सर्व हरचाच पसारा आहे.त्याच्यात दुतिया(दोन भाव)भावाने हर व माया असे दोन नाही जाणत.म्हणजे माया तसेच ब्रम्ह वेग-वेगळे न जाणता सर्व एकच सतस्वरुप ब्रम्हच आहे असे जाणतो. ।।६१।।

जेसे समद भऱ्यो जळ पाणी ।। लहर दिसन्तर जावे ।।
वांही एक निर्जळ सितळ ।। केबत दोय कुवावे ।।६२।।

ज्याप्रकारे समुद्राच्या पाण्याची लहर दूर देशान्तर जाते,तिला लहर म्हणतात.परंतु समुद्राचे पाणी आणि ती लहर दोन नाही.तर एकच आहे.या तऱ्हेने माया आणि ब्रम्हाला एकच समजो.समुद्राचे पाणी आणि लहरचे पाणी एकच आहे म्हणजे दोघांमध्ये पाणीच आहे.दोघांमध्ये शितलता एकच आहे.फक्त म्हणायला पाणी आणि लहर दोन म्हणवतात. (या तऱ्हेने ब्रम्ह तर स्वयम पूर्ण ब्रम्हच आहे.असेच मायेत ही तोच पूर्ण ब्रम्हच आहे.) याप्रकारे माया व ब्रम्ह एकच आहे असे जाणतो आणि दुसरे काही ही नाही असे जाणतो. ।।६२।।

असो ग्यान सरबते कहिये ।। भजे तजे नही पेले ।।
आपी ब्रम्ह क्रम कुण कहिये ।। युं होय जन जुग खेले ।।६३।।

असे ज्ञान समजून सर्वांमध्ये एकच सतस्वरुप ब्रम्ह समजतो.कोणाचे भजन ही करीत नाही आणि कोणाला सोडत ही नाही.स्वतःच ब्रम्ह आहे स्वतः माया नाही मग कर्म कोणाला म्हणावे असे होवून ते संत जगात राहतात.।।६३।।

भै दुख सोच जुग नही भ्यासे ।। हरषे नही कुमलावे ।।
तोटो नफो बरा बर देखे ।। युं सुखमांय समावे ।।६४।।

त्यांना संसारात कोणते ही भय,दुःख किंवा चिंता फिकीरचा भास होत नाही आणि ते चांगले होण्याने हर्षित होत नाही.आणि वाईट झाल्याने उदास होवून निराश ही होत नाही.हे संसारात नुकसान किंवा लाभाला समान जाणतात.या तऱ्हेने ते सुखात समावून जातात. ।।६४।।

ओ निजब्रम्ह अटळ अविनासी ।। ना कहुं गया न आया ।।

**जनमे मरे जका बिध असी ।। कपड़ा ब्होर बणाया ।।६५।।**

ते या जीवाला निजब्रम्ह,पूर्ण निजब्रम्ह सारखे अटल आणि अविनाशी म्हणजे नाश न होणारा,कोठे गेला ही नाही आणि कोठून आला ही नाही असे समजतात.जगात जन्म घेतो आणि मरतो त्याला अशी विधी समजतात.जसे शरीराचे घातलेले कपडे जुने होवून फाटून गेले.(जातात)मग दुसरा बनववितात.याचप्रकारे हा देह जुना होवून पडून गेला(गळून)आणि जन्म घेतला म्हणजे दुसऱ्या नव्या कपड्या सारखे बनून गेला असे समजतात. ।।६५।।

**युं मन ग्यान बिचारे सोऊँ ।। करे करावे नांई ।।**
**सब मे ब्रम्ह अेक ले चीने ।। ऊँच नीच के माहि ।।६६।।**

यातऱ्हेने मनात सर्व ज्ञान समजतात की,आम्ही काही करीत नाही आणि काही करवत ही नाही.असे ज्ञान समजतात.सर्वात एकच निजब्रम्ह आहे.असे जाणतात.उंच जातीचा असो अथवा निच जातीचा असो सर्वात एकच निजब्रम्ह आहे हे जाणतात. ।।६६।।

सिष वायक ।।

**सिष बुजे गुरुदेव कहिजे ।। संख नाम किम दिया ।।**
**जे नर कस जीत मन बैठा ।। सेजां कुण फल लिया ।।६७।।**

तेंव्हा शिष्य म्हणाला,शिष्य विचारतो की,हे गुरुदेवजी हे मला सांगा की,हे जे आपण सांगीतले,याला सांख्यनाव का दिले.(कश्या करीता दिले)जो मनुष्य मनाचा कसून आणि मनाचा जिंकून बसले आहे. त्यांना काय फळ मिळते. ।।६७।।

**किरपा करो भेद सब दीजे ।। सिष का भ्रम गमावो ।।**
**संख साज जन कहां समावे ।। सो ध्रम मोय बतावो ।।६८।।**

कृपा करुन सर्व भेद देवून शिष्याचा सर्व भ्रम मिटवून द्या.ही सांख्ययोगाची साधना करुन ते संत कोठे जावून मिळतात.तो धर्म मला सांगा. ।।६८।।

गुरू वायक ।।

**सतगुरू कहे सुणो सिष सुन मुख ।। संख नाम इम दिया ।।**
**सब ही ब्रम्ह भ्रम नही कोई ।। अर्थ देख घर लिया ।।६९।।**

सतगुरु बोलले की हे शिष्य,सन्मुख होवून ऐका.याला सांख्य नाव या कारणाने दिले की सर्वत्र सतस्वरुप ब्रम्हच ब्रम्ह आहे.सतस्वरुप ब्रम्हशिवाय कोणी दुसरा आहे हा भ्रम नाही.असा अर्थ पाहून,सतस्वरुप ब्रम्हचे घर मनाने पाहतात. ।।६९।।

**सो जन संख जोग इधकारी ।। सो प्रजा मन भावे ।।**
**सब ही टेल बन्दगी कर हे ।। चरणा सब चल आवे ।।७०।।**

तेच जन सांख्ययोगाचे अधिकारी आहेत.ते संत प्रजेच्या मनात आवडतात.त्या संताची सर्व टहल म्हणजे सेवा,प्रणाम करुन सर्व त्यांच्या चरणात चालून येतात. ।।७०।।

प्रथम संख फूल फळ लागे ।। अे सुख माँय समाया ।।
ब्रम्ह हरक बोहो हुवा राजी ।। देव लोक मे आया ।।७१।।

प्रथम सांख्ययोगाचे फूल आणि फळ जे लागते,त्याला ऐका.त्या सुखात जावून ब्रम्हाच्या सतलोकात सामावून जातात.त्यांचा निजब्रम्ह हर्षित होवून खुप राजी होतो आणि तो ब्रम्हाच्या देवलोकात येतो. ।।७१।।

ब्रम्हा का सतलोक बखाणे ।। धिन्न धिन्न जन होई ।।
आवागवण जनम अर मरणो ।। ओ सिर मिटे न कोई ।।७२।।

ब्रम्हाच्या सतलोकात तेथिल देव येणाऱ्या देवाची धन्य-धन्य असे म्हणून महिमा करुन व ब्रम्हाच्या लोकात धन्य होवून जातात,परंतु त्यांचे आवगमन,जन्म घेणे-मरणे मिटत नाही. ।।७२।।

दोहा ।।

सिष बुज्यो गुरूदेव कहयो ।। संख जोग मत छाण ।।
सुण चेला नेहचळ नही ।। चाकर धणी बखाण ।।७३।।

शिष्याने विचारले आणि गुरुने सांगितले.या सांख्ययोगाचे मत गुरुने पारखून सांगितले. गुरुने सांगितले शिष्य ऐक,हा ब्रम्हाचा लोक निश्चल नाही आहे म्हणजे प्रलयात जाईल, चाकर म्हणजे सांख्य योगाची साधना केलेले आणि धनी म्हणजे ब्रम्हा हे दोघे स्थिर निश्चल म्हणजे अमर नाही. ।।७३।।

अनन्त क्रोड़ आगे गया ।। फेर अनंता ही होय ।।
सुण चेला उण ब्रम्ह की ।। निमक न बरते कोय ।।७४।।

हे ब्रम्हा अनन्त कोटी पाहिले होवून गेले आणि पुढे ही अनन्त वेळा होतील.परंतु शिष्य ऐका इतक्या वेळात त्या सतस्वरुप ब्रम्हचा निमिष ही व्यतीत होत नाही. ।।७४।।

क्या ब्रम्हा केता भया ।। सरब काळ की चार ।।
सुण चेला तिहुँ लोक मे ।। सब शिर जम की मार ।।७५।।

हा ब्रम्हा काय वस्तु आहे?हे ब्रम्हा पहिले(आधी)कित्येक होवून गेले,सर्व ब्रम्हा काळाचा चारा आहे.जे ब्रम्हा पूर्वकाळात झाले,त्यांना काळ खावून गेला आणि भविष्यात ही जे होतील ते सर्व ब्रम्हा काळाचा चारा आहे.तर शिष्य ऐक.या तिन्ही लोकात सर्वांच्या वर,काळाची मार आहे.यम सर्वांना खावून जातो. ।।७५।।

सतशब्द श्रणो सही ।। नेहचळ नेम धान ।।
सुण चेला सुखराम कहे तत्त बाहिरा ।। सब मत्त उला जाण ।।७६।।

या सतशब्दाची शरण घेणे बरोबर आहे कारण की हा सतशब्द निश्चल आहे आणि त्याचे ध्यान ही निश्चल आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की या तत्त

सार म्हणजे ब्रम्ह मता शिवाय जे दुसरे मत आहे ते सर्व मत इकड्चे मायेचेच आहे,हे जाणा. ।।७६।।

सिष वायक ।।

धिन सम्रथ गुरूदेवजी ।। धिन द्रसण दीदार ।।
पतत उधारण बापजी ।। मो शिर टाळो मार ।।७७।।

शिष्य म्हणाला की समर्थ गुरुदेवजी आपण धन्य आहात आपले दर्शन ही धन्य आहे आणि दीदार ही धन्य आहे.पतीतांचा उध्दार करणारे बापजी माझ्या शिरावरची मार टाकून द्या. ।।७७।।

नवद्या भक्त संख निरणा किया ।। कसर न राखी कोय ।।
किरपा कर गुरूदेवजी ।। वो जोग बतावो मोय ।।७८।।

आपण नवविद्या भक्तीचा आणि सांख्य योगाचा निर्णय केला.निर्णय करण्यात कोणती कसर ठेवली नाही.आता गुरुदेवजी महाराज,कृपा करुन हटयोग मला सांगून द्या. ।।७८।।

कळ किमत सबही कहो ।। बरणो बिध बोहार ।।
क्या करणी साजन किया ।। को फल चाले लार ।।७९।।

हटयोगाची कल(कला)आणि किंमत सर्व सांगा आणि त्या मताची विधी आणि व्यवहार वर्णन करा.त्याची करणी काय आहे?त्याची साधना कोणती?आणि ती साधल्याने, कोणते फळ सोबत चालेल हे सांगा.।।७९।।

जोग रीत की बिध कहो ।। साज कुंण घर जाय ।।
क्या फळ अन्तर आद ले ।। कहां जन रहया समाय ।।८०।।

त्या योगाच्या रीतीची विधी सांगा आणि त्या योगाची साधना करणारा कोणत्या घरात जातो.त्याचे काय फळ शेवटी आणि आधी मिळेल.हे योग साधणारे संत कोठे सामावून राहतात. ।।८०।।

गुरू वायक ।। चोपाई ।।

सतगुरू कहे सुंणो सिष भेवा ।। जोग साजण का भाखुं भेवा ।।
ओऊँ शबद ऊठतो लेवे ।। मन सो सुरत पवन मे देवे ।।८१।।

सतगुरुनी सांगितले की,हे शिष्य ऐक भेद योग साधनेचा भेद मी सांगत आहे.ओहम शब्द श्वास उठते वेळी घेतात आणि मन सुरत पवन श्वासात देतात. ।।८१।।

सिध आसण साजे नर सोई ।। बूंदे सातु पोल मिलावे दोई ।।
डावो पाँव गुदा तळ ठेवे ।। दुजो पाँव लिंग पर देवे ।।८२।।

आणि सिध्दासनाच्या सर्व साधना करायला पाहिजे आणि शरीराचे नऊ दरवाजे बंद करुन मिळून द्या ते ह्या प्रकारे, डाव्या पायाची टाच गुदेखाली देवून टाचेवर बसून

गुदाद्वार बंद करा आणि दुसरे म्हणजे उजव्या पायाला लिंगावर ठेवून इंद्रियांना दाबून बन्द करा.।।८२।।

**सर्वण मांय अगुँठा दिजे ।। अंगळी पाँच नेण धर लिजे ।।**
**मुख कुं रोक होट सुं लिया ।। मन सो घेर नाभ मे दिया ।।८३।।**

आणि दोन्ही हाताचे दोन्ही अंगठे दोन्ही कानावर ठेवून दाबून बन्द करा आणि दोन्ही हाताची तर्जनी डोळ्यावर ठेवून दाबा.दोन्ही हातांची मध्यमा(मधले बोट)ने नाकाच्या छिद्रांना दाबून ठेवा आणि कनिष्ठ तसेच अनामिकाने होठांना खालून वरतून चिमट्या सारखे दाबून तोंड बंद करा आणि मनाला घेरुन नाभीत लावून द्या. ।।८३।।

**मूळ चक्र क्रिया नर साजे ।। तब शिर शब्द अनाहद गाजे ।।**
**सांस ऊँसास पवन कुं खंचे ।। मन की लाव सुरत सुं अंछे ।।८४।।**

यात-हेने मुळद्वाराच्या चक्राची क्रिया साधेल. तेंव्हा शिरावर(भृगुटी मध्ये)अनहद शब्द गरजू लागेल.(कानामध्ये अंगठ्याने दाबल्याने एक प्रकारची(त-हेची) ध्वनि ऐकू येते)ती ध्वनि भृगुटीत गरजू लागते.या त-हेने श्वासा-श्वासाने(श्वासोश्वासात)श्वास वरती खेचा मनाची डोर(दोरी)सुरत मध्ये खेचा. ।।८४।।

**च्यार मांस असा हट किया ।। जब जन कंवळ गुदा तज दिया ।।**
**खट कंवळ की सता ऊठाई ।। घेरो पडयो नाभ दळ मांई ।।८५।।**

याप्रकारे साधक चार महिने हट करेल तेंव्हा तो साधक गुदेचे कमल(मुळ चक्र)सोडून वरती चढायला लागेल (चढू लागेल) सहा पाकळ्यांच्या कमळाची(ब्रम्हाच्या स्थानाची) सत्ता उठवून देईल.तेंव्हा नाभीत कमळात येवून श्वासाचा घेरा पडेल. ।।८५।।

**पवन चक्र नाभ में खावे ।। अणमाऊं होय ऊँचो आवे ।।**
**अष्ट कंवळ दळ खाली किया ।। द्वादश पांख कंवळ मन दिया ।।८६।।**

नाभीमध्ये श्वास येवून चक्कर खावू लागेल आणि अमावू(पोटात मावत नाही)होवून श्वास वरती चढू लागतो.नाभीच्या आठ पाकळीच्या कमळाला खाली करुन,वरती हृदयाच्या बारा पाकळांच्या कमळात मन लावून दिले. ।।८६।।

**हट सो करे पचे दिन राती ।। फेरे मन सुरत कुं जाती ।।**
**काम काज सब तजे बोहारा ।। निस दिन पच्चे पवन की लारा ।।८७।।**

येथे हृदयात हट्ट करुन रात्र-दिवस पचू लागतो.मन आणि सुरत इकडे-तिकडे जाते. तिला घेरुन एका स्थानावर(हृदयात)आणतात.आणि संसाराचे दुसरे सर्व कामकाज करणे आणि सर्व व्यवहार सोडून देतो.रात्र-दिवस या श्वासाच्या मागे लागून,वरती चढवण्याकरीता पचत(थकत)राहतो. ।।८७।।

**खटसो मास वर्ष हट किजे ।। तब सज ध्यान भृगुटी लिजे ।।**

**आ क्रिया इसी बिध बखाणी ।। भ्रगुटी भेद तत्त बिध जाणी ।।८८।।**

या त-हेने सहा महिने किंवा वर्षभर हट करेल तेंव्हा ध्यान साधून,कंठाच्या सोळा पाकळीच्या कमळातून गळ्यात(कंठामध्ये पडजीभ आहे त्या पडजीभेला एकदम बारीक छिद्र आहे त्या छिद्रांतून भृगुटीत जातो)याप्रकारची भृगुटीच्या भेदाची तत्त विधी आहे. ती मी तुला सांगितली आहे ती तुम्ही जाणून घ्या ।।८८।।

**जब लग कसे सजे जन काया ।। तब लग आहार छुछम कर भाया ।।**
**सागट सभा सलळ कुं त्यागे ।। निद्रा छुछम रात दिन जागे ।।८९।।**

जो पर्यंत या योगाची साधना कसून करेल तो पर्यंत आहार(भोजन)सुक्ष्म(थोडेसे)घ्या आणि सागट(निंदक)लोकांच्या सभेत जाण्याचा त्याग करा.आणि झोप एकदम कमी घ्या,रात्र-दिवस जागे रहा. ।।८९।।

**चाले गेले कबु नहीं धावे ।। मुख सुं बेण छुछम सो लावे ।।**
**बायर दशा इसी विध कहिये ।। आसण इड़ग ईकन्तर रहिये ।।९०।।**

रस्त्याने चालतांना कधी ही लवकर-लवकर पळत चालु नका.एकदम आरामाने,शरीराला धक्का न लागेल असे चाला आणि मुखाने बोलायचे असेल तर एकदम सुक्ष्म थोडेसे बोला.बाहेरची दशा यात-हेने ठेवा.असे आसन अढिग लावून एकांतात रहा. ।।९०।।

**देखा देख सजे नही कोई ।। उपजे दोस रोग तन होई ।।**
**साचा गुरू सिष व्हे सुरां ।। साजे जोग चड़े मुख नुरा ।।९१।।**

हा योग दुस-याला करतांना पाहून साधला जात नाही.दुस-याचे पाहून कोणी साधेल तर त्याच्या शरीरात रोग उत्पन्न होईल.शरीरातील श्वासाने दोष उत्पन्न होवून,वात,पित्त, कफ होवून जाईल.मारवाडीत एक म्हण आहे की,देखा देखी साजे जोग,छिजे काया उपजे रोग,खरे तर या योगाचा भेदी गुरु मिळेल आणि शुरवीरासारखा साधना करणारा शिष्य असेल तर तो शिष्य या योगाची साधना करेल तेंव्हा या शिष्याच्या मुखावर हटयोग साधनेचे तेज येवून जाईल. ।।९१।।

सिष वायक ।।

**सिष बुजे सुणो गुरूदेवा ।। झूठ सांच का कहिये भेवा ।।**
**कुण गुरू साच झुठ कुंण कहिये ।। कहो सिष सूर किसी बिध रहिये ।।९२।।**

तेंव्हा शिष्य म्हणाला की,मी आपणास विचारतो हे गुरुदेवजी आपण ऐका.या खोट्या गुरुचा आणि ख-या गुरुचा भेद मला सांगा.कोणत्या गुरुला खरे म्हणावे व कोणत्या गुरुला खोटे जाणावे आणि शिष्य शूरवीरतेने कसा राहावा हे मला सांगा. ।।९२।।

**से सब मुझ कुं भेव बतावो ।। परसण होय ग्यान निज लावो ।।**
**सतगुरू सुणो सिष का भेवा ।। साचा गुरू ग्यान रस लेवा ।।९३।।**

हा सर्व भेद मला सांगा.आपण प्रसन्न होवून आपले निजज्ञान मला सांगा.सतगुरु आपण शिष्याच्या भेदाचे वर्णन ऐकवा.खरे गुरु असतील त्यांच्या ज्ञानाचा रस घ्या. ।।९३।।

गुरू वायक ।।

आप तिरे और न कुं त्यारे ।। पिन्ड ब्रहमंड का भेद बिचारे ।।
सो सब ग्यान पिन्ड मे जोवे ।। सिल साच खिम्या घट होवे ।।९४।।

गुरुंनी सांगितले,गुरु असा असायला पाहिजे की,स्वत: तरेल आणि दुसऱ्यांना तारुन देईल आणि पिण्डमध्ये सर्व ब्रम्हांडाच्या भेदाचा विचार करुन पाहून घेईल.तो गुरु सर्व ब्रम्हांडाचे ज्ञान आपल्या पिंडातच पाहून घेईल.अशा गुरुच्या घटात शील(ब्रम्हचर्य), साच(साहेबाचा विश्वास)आणि क्षमा राहते. ।।९४।।

जा सुं चाल जुगमे आया ।। ज्यांते बिछडया ज्हा जाय समाया ।।
नेणा देख कहे सो साची ।। काना सुणी द्रिढावे काची ।।९५।।

आणि जेथून चालत वेगळा होवून संसारात आला. त्यातच जावून सामावून गेला आणि जो गुरु डोळ्यांनी पाहून सांगतो. तोच गुरु खरा आहे.जे गुरु दुसऱ्यांचे सांगितलेले ज्ञान कानाने ऐकून दुसऱ्यांना(शिष्यांना)धारण करण्यास सांगतात,ते गुरु कच्चे आहे.।।९५।।

काना सुणी सिष नर गावे ।। तब लग सन्त मन नही भावे ।।
सीख ग्यान सतगुरू होय बेठा ।। से सिख भ्रम कपट में पेठा ।।९६।।

आणि कानाने ऐकून शिकून जातात,तेच शिकलेले ज्ञान दुसऱ्यांना वर्णन करुन सांगतात. तोपर्यंत ते संत माझ्या मनाला आवडत नाही.जे दुसऱ्यांचे सांगितलेले ज्ञान ऐकून सतगुरु बनून बसले आहे तर ते शिष्य ते गुरु भ्रम आणि कपटमध्ये बुडाले आहे.।।९६।।

नेचे जाय नरक के मांहि ।। सीख ग्यान सतगुरू कुवाई ।।
निज तत शब्द भेद नही पावे ।। सिख साखा शिर हुकम चलावे ।।९७।।

ते गुरु निश्चितच नर्कात जातील.ते दुसऱ्यांजवळून ज्ञान ऐकून सतगुरु बनून बसले आहे.त्यांना निजतत्तचा म्हणजे सतशब्दाचा भेद मिळाला नाही.ते गुरु बनून आपले चेले,शिष्य व शिष्यांचे शिष्यांवर हुकूम चालवतात. ।।९७।।

से गुरू झूट भेद नही पाया ।। सुण सुण ग्यान ओराँ के भाया ।।
चोडे अर्थ जुग के मांही ।। बिन दिठा सब झूट कहां ही ।।९८।।

ते गुरु खोटे आहे की,ज्यांना स्वत:लाच भेद मिळाला नाही व ते दुसऱ्यांचे ज्ञान ऐकून-ऐकून दुसऱ्यांना सांगतात हा जगात प्रगट अर्थ आहे की डोळ्यांनी पाहिल्या शिवाय जे सांगतात ते सर्व गुरु खोटे म्हणवतात. ।।९८।।

देख कहे साचा जन होई ।। सुण सिष भेद बताऊँ ताई ।।
साचा गुरू सुध बुध सांई ।। सिष को कारज सिष के मांही ।।९९।।

जे डोळ्यांनी पाहून सांगताता तेच संत खरे आहे.शिष्य तुम्ही ऐका या दोन्ही खरे गुरु आणि खोट्या गुरुचा भेद मी तुम्हाला सांगतो.जे खरे गुरु आहेत.त्यांना साई(स्वामी) ची सुध बुध आहे.ते शिष्याचे कार्य,शिष्याच्या तनातच करुन देतात. ।।९९।।

**कायर सिष पास जो बैठा ।। बोहोत ग्यान पण वे नई सेठा ।।**
**गुरू सिमरथ सिष सुरा चहिये ।। जब जुग जीत अटळ घर रहिये ।।१००।।**

गुरु खरे असतील आणि कायर शिष्य म्हणजे गुरुचे सांगितल्या नुसार साधना करण्यात घाबरणारा शिष्य खऱ्या गुरु जवळ जरी बसला,त्याला सतगुरुने खुपसे ज्ञान ही दिले तरी ही तो शिष्य पक्का मजबून होणार नाही.गुरु तर समर्थ असायला पाहिजे आणि शिष्य गुरु जे करायला सांगतील त्याच्यात मागे पुढे न पाहता कुदून करणारा असा शुरवीर पाहिजे.तेंव्हा तो शिष्य जगाला जिंकून अटल घरात जाईल. ।।१००।।

**सिष साजे गुरू भेव बतावे ।। दोनु तिड़ा बरोबर व्हावे ।।**
**जब ही जोग चडे निर्वाणा ।। भ्रगुटी ध्यान समाधी ध्याना ।।१०१।।**

गुरु ज्याप्रकाराने(ज्या तऱ्हेने)भेद सांगतिला,शिष्य त्या तऱ्हेने साधना करुन घेईल. तेंव्हा दोन्ही किनारे बरोबर म्हणवतील(नदीचे पाणी एकाच किनाऱ्याने वाहत राहीले तर दुसऱ्या किनाऱ्यावर पाणी मिळत नाही.जेंव्हा नदी दोन्ही किणाऱ्यावर भरपूर वाहू लागेल, तेंव्हा दोन्ही किनाऱ्यावर पाणी मिळेल)आणि तेंव्हा योग निर्वाण पद चढेल.शिष्याला त्रिगुटीचे ध्यान लागून,समाधि लागून जाईल. ।।१०१।।

दोहा ।।

**सो गुरू कुं नर भुलग्या ।। तिन कुं वार न पार ।।**
**नरक कुन्ड सुखराम क्हे ।। जुग जुग झुलण हार ।।१०२।।**

अशा गुरुंना जे मनुष्य विसरुन जातात,त्यांना केवल वार पार मिळत नाही.असे शिष्य युगांपर्यंत नर्ककुंडात झुलत राहतात.असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१०२।।

**जुग जुग संगत साध की ।। प्राण संवा गुरूदेव ।।**
**सो अबनासी आसरे ।। सुखीया सब जुग सेव ।।१०३।।**

युगा-युगापासून साधुची संगत करेल आणि गुरुला आपल्या प्राणापेक्षा ही अधिक समजेल अविनाशाच्या आसऱ्याने राहील.त्याची सर्व जगत सेवा करेल. ।।१०३।।

**सो संग कदे न बिछडे ।। सदा रहे इन पास ।।**
**ता कुं तज सुखराम के ।। करे आंन की आर ।।१०४।।**

जो नेहमी संग(सोबत)राहतो तो कधी ही वेगळा होत नाही.असा रामजीला सोडून अन्य दुसऱ्या देवांची कधी आशा करीत नाही. ।।१०४।।

**ओ गुरू एता गुण रहे ।। सन्त कहे मुख बेण ।।**

आद अंत सुख क्हे ।। सत पुरषा का सेण ।।१०५।।

जे गुरु इतके गुण करतात असे संत आपल्या मुखाने वचन बोलतात आदि पासून अंतपर्यंत ते सतपुरुषाचे सच्चन आहे,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात. ।।१०५।।

तिण नर अे गुरू ना लख्या ।। बुडा आन उपास ।।
मगन हुवा सुखराम क्हे ।। मन ही मन की आस ।।१०६।।

ज्या मनुष्याने अशा गुरुला जाणले नाही आणि अन्य देवांची उपासना करण्यात बुडून गेला.आपल्या मनातच,मनाच्या आशेत मग्न होवून गेले. ।।१०६।।

साचा सतगुरू संग रे ।। मत तज दिजे पूठ ।।
इण खून सुखराम केहे ।। जुग जुग ले जम लूठ ।।१०७।।

खऱ्या सतगुरुंच्या सोबत रहा.खरे सतगुरु सोडून त्यांच्याकडे पाठ करु नका.नाही तर या गुन्ह्यामुळे युगायुगापर्यंत यम लुटेल.असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१०७।।

सिष वायक ।।

संख जोग नवद्या कही ।। ओर अष्टंग को भेव ।।
पराभक्त मो सुं कहो ।। सिख बुजे गुरूदेव ।।१०८।।

शिष्य म्हणाला.आपण मला सांख्ययोग सांगितला नवविद्या(नवद्या)भक्ती सांगितली आणि अष्टांगयोगाचा भेद ही मला सांगितला.आता पराभक्ती मला सांगा.याप्रकारे शिष्य, गुरुदेवांना विचारत आहे.।।१०८।।

गुरू वायक ।।

मे सब ही मत बरणिया ।। फेर या का बिश्राम ।।
अब परा भक्त तो सुं कहुँ ।। ज्युं पुंते निजधाम ।।१०९।।

गुरुने सांगितले की,मी सर्व मत वर्णन करुन सांगितले आणि त्या मतांचे पोहचण्याचे स्थान ही सांगितले आता तुम्हांला पराभक्ती सांगतो.त्या पराभक्ती ने तुम्ही निजधामास पोहचून जाल. ।।१०९।।

नवदा निरफल नाँव बिन ।। अष्टंग बड़ी उपाद ।।
संख जोग स्यारो नहीं ।। विदिया मांहि वाद ।।११०।।

ही नवद्या भक्तीत निजनाम नाही म्हणून परमपद प्राप्त करण्याकरीता निष्फळ आहे.तरी ही परमपद मिळत नाही आणि आष्टांग योगात मोठी उपादी आहे.सांख्ययोगात परमपदाचा आधार नाही आणि अन्य मायेची विधी शिकण्यात वाद विवाद होतो. ।।११०।।

पराभक्त सब सुं सिरे ।। सन्ता करी कबूल ।।
हे सिष या बिन दुसरी ।। सब माया की भूल ।।१११।।

ही पराभक्ती सर्वात श्रेष्ठ आहे. म्हणून सर्व संतांनी कबुल केले आहे हे शिष्य, या

पराभक्तीच्या शिवाय जितक्या भक्त्या आहेत,मायेच्याद्वारे टाकली गेलेली भुल आहे. ।।१११।।

परा‍भक्त घट प्रगटे ।। तो साहिब सदा हजूर ।।
द्रब नेण देखे सदा ।। तेज पूंज का नूर ।।११२।।

ही पराभक्ती घटात प्रगट झाल्यावर,साहेबाच्या सदैव हजूर(सोबत)राहतो.त्या साहेबाचे तेजपुंजाचे नुर मायेच्या तेजपुंजासारखे सतस्वरुपाच्या दिव्य नेत्रांनी पाहत राहतो. ।।११२।।

शब्द घोर तिहुँ लोक मे ।। आगे अगम उजाळ ।।
जन सुखिया उण देस मे ।। कोई जुंरा न झाँपे काळ ।।११३।।

या शब्दाची घोर आवाज(ध्वनि)तिन्ही लोकात होते.आणि पुढे अगम देशात उजेड होतो.सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,त्या देशात म्हातारपण येत नाही.आणि काळ झडप घालीत नाही. ।।११३।।

साखी ।।

सरवण शब्द पधा रिया ।। तब अेसी गम होय ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। भेद बताऊँ तोय ।।११४।।

जेंव्हा सर्व प्रथम गुरुच्या मुखातून शब्द शिष्याच्या कानात येतात.तेंव्हा असे माहित पडू लागते,हे शिष्य तुम्ही ऐका,मी तुम्हाला भेद सांगतो. ।।११४।।

वहां बेदासा व्हे नई ।। बेठ निरन्तर जाय ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। श्रवण सबद के वाय ।।११५।।

जेथे कोणत्याही प्रकारची बोल-चाल,गोंधळ होत नाही,अशा एकांत स्थानावर(जागेवर) जावून बसायला पाहिजे.अशा एकान्त स्थानावर जावून गुरुपासून शब्द कानाने ऐका. असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।११५।।

रसणा मे रस ऊपजे ।। खट रस न्यारा साद ।।
सुण सिष तुं सुखराम केहे ।। अे ब्रम्ह मिलण का चाव ।।११६।।

मग रसनेने स्मरण केल्याने रसनेमध्ये(जिभेमध्ये)रस उत्पन्न होतो.त्या रसाचा सहा प्रकारचा तऱ्हेतऱ्हेचा स्वाद येवू लागतो.शिष्य तुम्ही ऐका,हे ब्रम्ह मिलनचे लक्षण आहे. ।।११६।।

खाटा मीठा चरपरा ।। इम्रत उतऱ्या जोर ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। लिव बंध लागी ड्रोर ।।११७।।

खारट,गोडं(खारट गोड मिश्रीत)आणि चटपटे जोराने अमृत उतरु लागले.शिष्य तुम्ही ऐका,लब बंध भजनाची दोरी लागून गेली. ।।११७।।

कंठ मे गद गद ऊपजे ।। निरख रहयो तब मन ।।
सुंण सिष तुं सुखराम क्हे ।। धिन गुरू साधु जन ।।११८।।

आणि कंठात गद गुदगुदी उत्पन्न होते.हे चिन्ह मन पाहून राहीले आहे.सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,शिष्य तुम्ही ऐका.ते गुरु,ते साधु आणि ते जन धन्य आहे. ।।११८।।

हिरदा मे फरफर हुवा ।। शब्द समागम माँय ।।
सुंण सिष तुं सुखराम क्हे ।। हियो भर भर जाय ।।११९।।

कंठाने शब्द हृदयात आला तेंव्हा फरफर होवू लागले.आणि शब्दाचे आत समागम झाले. शिष्य तुम्ही ऐका हृदय भरुन–भरुन नाभीमध्ये जावू लागला. ।।११९।।

नांव कंवळ हर आविया ।। गरजी सब बनराय ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। बास चहुँ दिस जाय ।।१२०।।

जेंव्हा नाभी कमळात शब्द येवू लागला.तेव्हा वनराय गरजू लागले.(रोमारोमातून शब्द निघू लागला)तर शिष्य तुम्ही ऐका.तेंव्हा सुगंधी च्यारी कडे जावू लागली. ।।१२०।।

मोर पपइया बोलीया ।। भँवरा करे गुंजार ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। ज्युं जाण्यो सेर सवार ।।१२१।।

तेथे मोर बोलण्याचा आवाज आणि कोकीळा बोलल्यासारखी आणि खुपसे भवरे,एकत्र गुंजार करतात.अशी गुंजार ध्वनि माहित होवू लागली.शिष्य तुम्ही ऐका ज्याप्रकारे एकदम सकाळी शहराचे लोक जागे होवून जातात,तर त्यांचा जसा आवाज होतो,तसे माहित पडू लागले. ।।१२१।।

ठंडी लहरां उपाय कर ।। अब धसिया पाताळ ।।
सुंण सिष तुं सुखराम क्हे ।। सेस दरस दिदार ।।१२२।।

आणि थंड–थंड लहर उत्पन्न होवून आता खाली पाताळ मध्ये धसला.शिष्य ऐक,तेथे पाताळात शेषाचे(कुंडलिनीचे)दर्शन होवून, शेष दिसू लागला. ।।१२२।।

सुरत शब्द मिल उलटिया ।। खुलिया पिछम घाट ।।
सुंण सिष तूं सुखराम क्हे ।। पाई आदु बाट ।।१२३।।

तेथून सुरत आणि शब्द एका जागी मिळून,बंकनाळेच्या रस्त्याने उलटतात.तेंव्हा पश्चिमचा घाट उघड्तो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,शिष्य तुम्ही ऐका, तेथून आदि घराचा रस्ता मिळाला. ।।१२३।।

जांहाँ हम धोती पेरता ।। रेई कनारी जाण ।।
सुंण तुं सिष सुखराम क्हे ।। शब्द लख्या परमाण ।।१२४।।

जेथे आम्ही धोतर नेसत होतो,।। रुई किनारी जाण ।।( )शिष्या तू ऐक,शब्द लखून शब्दा प्रमाणे केला. ।।१२४।।

अब चड़ीया असमान कुं ।। जाकी सुणज्यो आण ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। दे ज्युं चड़ी कवाण ।।१२५।।

आता येथून आकाशात चढलो.त्याची हकीगत येवून ऐक,शिष्य तुम्ही ऐका हा देह (शरीर)कमान सारखा बनूल चढून गेला. ।।१२५।।

मेर थान अस्थान था ।। जब अेसी गम होय ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। धनक चड़ायो जोय ।।१२६।।

मेरुच्या स्थानात जात होता तेंव्हा हे शिष्य तुम्ही ऐका,जसे धनुष्य बाण खेचतात तसेच पाठ कमानी सारखी झुकून गेली.असे पाहित होत होते. ।।१२६।।

सुरग इकिसी छेकिया ।। ज्युं सार सुं काट ।।
सुण सिख तु सुखराम क्हे ।। दुल्लब पिछम बाट ।।१२७।।

पाठीच्या एकविस स्वर्गाचे जेंव्हा छेद्न केले ते जसे लाकडामध्ये छेद् करतात.तसेच पाठीच्या एकविस मण्यांचे छेद्न केले.शिष्य तुम्ही ऐका हे पश्चिमच्या रस्त्याने जाणे खुप दुर्लभ आहे,कठीन आहे. ।।१२७।।

बस्त अमाउ भर रही ।। बासण जोखो खाय ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। शब्द मेर घर मांय ।।१२८।।

जसे एखाद्या भांड्यात वस्तु मावत नाही. खुप दाबून भरल्यावर भांडे तड्कून जाते.तसे तड्कण्याची भिती उपजते.शिष्य तुम्ही ऐका.तेंव्हा शब्द मेरुच्या घरी येतो.।।१२८।।

अब चड़ीया समेर पर ।। बचन न बोल्या जाय ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। मन डरप्यो तन मांय ।।१२९।।

आता सुमेरच्या वर चढला.तेंव्हा वचन बोलले जात नाही.शिष्य तुम्ही ऐका शरीरात निजमन घाबरु लागले. ।।१२९।।

साय करी जग दीस ने ।। सामां मेल्या सेण ।।
सुंण सिष तुं सुखराम क्हे ।। बोल्या अमृत बेण ।।१३०।।

मन घाबरु लागले.तेंव्हा जगदिशने सहाय्यता केली,जाणकाराला समोर पाठविले,जो जाणकार समोर येवून अमृतासारखे मधुर वचन बोलू लागला. ।।१३०।।

सेण संग होय ले चल्या ।। उडया सुन की बाट ।।
सुण सिष तुं सुखराम क्हे ।। खुलीया भिस्त कपाट ।।१३१।।

तो समोर आलेला जाणकार, माझ्या सोबत येवून मला घेवून चालला. तो मला घेवून सुन्तच्या रस्त्याने उड्वले शिष्य तुम्ही ऐका,पुढे भेस्तचा(वैकुंठाचा)दरवाजा उघड्ला. ।।१३१।।

दोनु तरफा दोय लगी ।। बिचे सुख मण सीर ।।

सुण सिष तुं सुखराम क्हे ।। मिल्या त्रिवेणी तीर ।।१३२।।

दोन्ही बाजूने इडा आणि पिंगळा असे दोन्ही लागल्या आणि या दोघांच्या मध्ये सुषमना लागली. शिष्य ऐक हे इडा, पिंगळा आणि सुषमना ज्या जागेवर एकत्र होतात,त्या त्रिवेणीच्या किनाऱ्यावर जावून मिळाले. ।।१३२।।

तीनु मिल मन एक वां ।। चल्या पीव के पास ।।

सुंण सिष तुं सुखराम क्हे ।। छूटी आन उपास ।।१३३।।

तिन्ही मिळून एक झाल्या.तेथून पीव(पतीच्या)जवळ चालला.शिष्य ऐक,आन म्हणजे दुसरी सर्व उपासना खोटी आहे. ।।१३३।।

पिव द्रस्या प्रस्या सही ।। जामे फेर न कोय ।।

सुण सिष तुं सुखराम क्हे ।। भेद बताऊँ तोय ।।१३४।।

पुढे गेल्यावर पतीचे दर्शन झाले आणि पतीला भेटला ही गोष्ट खरी आहे.(भेटण्यात काही अंतर राहीले नाही)शिष्य तुम्ही ऐका.मी याचा भेद सांगतो. ।।१३४।।

पोप बास ना लिजीये ।। सांसो नही लगार ।।

सुण सिष तुं सुखराम क्हे ।। अलख पुरष दीदार ।।१३५।।

तेथे जावून फुलाची सुगंध घ्या.आणि सांसो(फिकीर)काही ही लगाव(किंचितही)थोडी ही नाही.शिष्य ऐका तेथे अलख पुरुषाचा दिदार आहे. ।।१३५।।

जळ मे मच्छी रम ही ।। गेल न दरसे कोय ।।

सुण सिष तुं सुखराम क्हे ।। हरजन मे हर होय ।।१३६।।

पाण्यात मासोळी खेळत आहे.त्या मासोळीचा येण्या–जाण्याचा रस्ता,काही कोणाला दिसत नाही.या तऱ्हेने हरजनात(संतामध्ये)हर आहे. ।।१३६।।

थाळी मे झणणाट रे ।। बाजा मांय छत्तीस ।।

सुंण सिष तुं सुखराम क्हे ।। युँ जन मे जगदिश ।।१३७।।

याप्रकारे हरीजनात हर राहतो.जसे काश्याच्या थाळीत झनकार ध्वनि असतो(असे तर काश्याच्या थाळीत झनकार ध्वनि दिसत नाही,परंतु त्याला धक्का लागल्यावर त्याच्यातून आवाज निघतो ती झनकार त्याच्यात होती म्हणून निघाली,नसती तर कोठून आवाज आला असता)या तऱ्हेने बाजे,हारमोनियम,सितार,सारंगी इत्यादी पासून छत्तीस प्रकारचे राग रागिणी निघतात.या तऱ्हेने हरजनात(संतात)ब्रम्हाचे वाक्य(ब्रम्ह ज्ञान निघते) बाजांमध्ये छत्तीस रागिण्या होत्या म्हणून निघत होत्या तसेच हरजनात हर आहे,तर शिष्य ऐक.याप्रकारे जन(संतामध्ये)जगदिश आहे. ।।१३७।।

तेल तीला मे नीस रे ।। जामे फेर न सार ।।

सुण सिष तुं सुखराम क्हे ।। गुरू मिलीयां दीदार ।।१३८।।

तेल तिळातून निघते याच्यात फेर नाही.तर शिष्य ऐक गुरु मिळाल्यावर(तिळात तेल आहे,ते असे तर दिसत नाही.परंतु घाण्यात टाकल्यावर फिरवल्यावर त्यांच्यातून तेल निघते)या त-हेने गुरु मिळाल्यावर हर भासतो(मिळतो) ।।१३८।।

सवइयो इन्द व छन्द ।।

**सास उसास कहे हरी नाम ।। फिरे रसणा मुख मे दिन राती ।।**
**धिरज ध्यान अडोल न डोले ।। आसण मार उकासु छाती ।।**
**नाळ समीसळ राखत नाही ।। मोडत अंग न बन्धत बाती ।।**
**मन कुं थोब पवन सुं मेळा ।। सुरत समोय निरत कर साती ।।**
**सुखराम कह युं ध्यान धरो ।। ज्युं दीप सुं जोत जले हे बाती ।।१३९।।**

श्वासा-श्वासात(येत्या-जात्या श्वासात)हरचे नाम घेवू लागतो.मुखात रसना रात्रं-दिवस चालू लागते.ध्यान करतो,धीरज ठेवतो(धिर ठेवतो)आसन असे लावतो की अडोल डोलत नाही.(झामगत नाही)असे आसन लावून उकसू छाती(ताणलेली छाती) आणि आपली मान सरळ ठेवतो.मानेत सळ(ढिल)पडू देत नाही आणि मनाचा आणि श्वासाचा मेळ करुन देतो.या मन व श्वासात सुरत ही मिळवून देतो.याच्यासोबत निरतला ही करुन देतो.(निरत म्हणजे सुरत वर ध्यान(लक्ष्य)ठेवणारी)या चारींचा संग करुन देतो. आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की या त-हेने ध्यान धरा. जसे दिपक ज्योतीने वरच्या दिव्याची वात जळून जाते. ।।१३९।।

कवत ।।

**सतगुरू सम्रथ होय ।। ग्यान की कसर न राखे ।।**
**आद अंत की बात ।। ताप ले भिन भिन भाखे ।।**
**सिष बूजे सो वार ।। झळक ऊना नही होवे ।।**
**धिरज सुं दे ग्यान ।। भ्रम सिष का सब खोवे ।।**
**उलज्या कुं सुल जाय दे ।। अे सतगुरू सेनाण ।।**
**दुजा तो सुखराम के ।। कन फुका गुरू जाण ।।१४०।।**

सतगुरु समर्थ असल्याने शिष्याला ज्ञान सांगण्यात काही कसर ठेवत नाही.ते समर्थ सतगुरु आदि आणि अंतची गोष्ट घेवून वेग-वेगळे करुन सांगतात.शिष्याने शंभर वेळा विचारले तरी ही चिडून क्रोधीत होत नाही.शिष्याला धैर्य पूर्वक(शांती पूर्वक)ज्ञान देवून शिष्याचे सर्व भ्रम काढून टाकतात.शिष्य कशा ही फाश्यात अडकलेला असो तरी ही त्याला सोडवून अडकलेल्या शिष्याला मुक्त करुन देतात आणि दुसरे गुरु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की कान पुंकणारे गुरु जाणा. ।।१४०।।

**करे झोड बोहो भांत ।। भेद बिन पूस पीछाटे ।।**
**जडी रोग गम नाय ।। फूस कच रो सब बांटे ।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

पुंगी रांग बिराग ।। ढोल बिन सुध बजा वे ।।
चहुं दिस चाले गेल ।। राग बिन नाटक गावे ।।
सिकल बिकल चरचा करे ।। देश अर्थ नही मांय ।।
जां के संग सुखराम क्हे ।। जीव गंता सुं जाय ।।१४१।।

दुसरे गुरु खुप तऱ्हेने झोड करतात.बक-बक करतात.त्या गुरुला भेद तर नाही,ते भेदा शिवाय भुसा फटकतात.(जसे भुश्यात दाणा तर नाही परंतु तो त्याला फटकतात तर त्याच्यातून दाणा राहील्या विना कोढून निघेल?असेच ज्या गुरुला भेद माहित नाही,तो भेदशिवाय कचरा फटकतो तर त्या फटकण्याने भेद कोढून निघणार)जडीची (औषधाच्या जडीची)आणि रोगाची माहिती नाही.परंतु घास-चारा-भूसा गवत सर्व घेवून खलबत्यात कुटतात आणि पुंगी(बिण)वाजवता येत नाही विना रागिणीने(बेसूर)वाजवितो आणि ढोल वाजविता येत नाही आणि बिना सुधने(समजने)ढोल वाजवितो आणि रस्ता माहित नाही चारी दिशांना,कधी पूर्व,तर कधी पश्चिमला,कधी उत्तर तर कधी दक्षिण असा चारी दिशांना चालणारा कोठे जावून पोहचेल.नाटकाचा राग माहित नाही.आणि रागिणीच्या शिवाय नाटक गातो.या तऱ्हेने जे गुरु सिफळ-विफळ चर्चा करतात, इकडची तिकडची चर्चा करतात.या तऱ्हेने चर्चा केल्याने उद्देश आणि अर्थ काहीच निघत नाही.असे गुरुच्या संगाने जीव गतास जातो(समूळ नष्ट होऊन जातो)असा गुरुचा संग करु नका असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१४१।।

।। इति श्री गुरू शिष्य को संवाद संपूरण ।।